| Estd. 1962<br>"A++" Accredited by NAAC(2021)<br>With CGPA 3.52 | **SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA**<br>PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in,<br>E-mail.: appointment.a@unishivaji.ac.in, appointment.b@unishivaji.ac.in<br>**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416004**<br>**महाराष्ट्र**<br>फोन : ईपीबीएक्स – 2609000, 0231-0231- 2609102, 0231-2609103 |
|---|---|


**संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/385** **दि.** 4 OCT 2022

**प्रति,**

| | |
|---|---|
| **मा. प्राचार्य**<br>महावीर महाविद्यालय, कोल्हापूर | **मा. प्राचार्य**<br>गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय, कोल्हापूर |
| **मा. प्राचार्य**<br>भोगावती महाविद्यालय कुरूकली, ता. करवीर, जि. कोल्हापूर | **मा. प्राचार्य**<br>श्रीपतराव चौगुले आर्ट्स ॲण्ड सायन्स कॉलेज माळवाडी, कोतोली. ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर |
| **मा. प्राचार्य**<br>सदगुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड, जि. सातारा | |

**विषयः शैक्षणिक वर्ष 2020–21 मधील ऑक्टो./नोव्हे. 2020 व मार्च/एप्रिल, 2021 सत्रातील बी. व्होक. अभ्यासकमाच्या (प्रथम वर्ष – प्रथम व द्वितीय सत्र) परीक्षेच्या नियोजनाबाबत.**

महोदय/महोदया,

आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, आयडीएस विद्याशाखेतंर्गत शैक्षणिक वर्ष 2020–21 पासून उपरोक्त महाविद्यालयामध्ये बी. व्होक अभ्यासकम सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर परीक्षा आयोजित करण्यासाठी महाविद्यालय स्तरावर पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1. शैक्षणिक वर्ष 2020–21 मधील नव्याने सुरू झालेल्या बी. व्होक अभ्यासक्रमाच्या ( प्रथम सत्र –ऑक्टो./नोव्हें. 2020 व द्वितीय सत्र – मार्च/एप्रिल 2021) विद्यार्थ्यांच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर Online/Offline पध्दतीने घेण्यात याव्यात.
2. उपरोक्त परीक्षेचे परीक्षा अर्ज भरण्यासाठीचा दिंनाक व परीक्षा प्रारंभ तारीख खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ. कं. | परीक्षा | परीक्षा शुल्क | परीक्षा अर्ज भरण्याची मुदत | परीक्षा प्रारंभ तारीख |
|---|---|---|---|---|
| 1 | B.Voc. Diploma in Security Management | 370/– प्रति सत्र | दि. 04/10/2022 ते दि. 12/10/2022 | दि. 18/10/2022 |
| 2 | B.Voc. Photo Graphic and video Design | | | |
| 3 | B.Voc. Building Tech. And Interior Designing | | | |
| 4 | B.Voc. Degree in Paramedical and Health Administration. | | | |
| 5 | B.Voc. Diploma Beauty & wellness | | | |
| 6 | B.Voc. Degree Chemical and Petrochemicals/chemical Technology | | | |
| 7 | B.Voc. Diploma in Nursing & Hospital Management | | | |
| 8 | B.Voc. Degree computerized Art& sketch Tech. | | | |
| 9 | B.Voc. Degree Agriculture/ cane Agriculture and sugar Tech | | | |
| 10 | B.Voc. Degree IT/ITES/computer and Program | | | |
| 11 | B.Voc. Degree Healthcare/Nursing | | | |

1. उपरोक्त परीक्षेसाठी महाविद्यालयामार्फत वेळापत्रक तयार करणे, वेळापत्रक प्रसिध्द करणे, प्रश्नपत्रिका तयार करणे व संपूर्ण परीक्षेचे नियोजन करून सुरळीतपणे परीक्षा पार पाडण्यात याव्यात.

2. संबंधीत महाविद्यालयांनी ज्या विषयास विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत त्या विषयाच्या प्रश्नपत्रिका सेट तयार करून घेणेत याव्यात. महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी त्यामधील एका प्रश्नपत्रिकेची निवड करून सदर प्रश्नपत्रिका परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांना देणेत यावी.

3. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार उपरोक्त परीक्षा 50 गुणांची (प्रश्नपत्रिकमध्ये एकूण 25 प्रश्न प्रत्येकी 02 गुणांचे असावेत), 1 तासाची, बहुपर्यायी प्रश्नावली (MCQ) पध्दतीने घेणेत यावी.

4. सदर परीक्षेसाठी ज्या त्या अभ्यासमंडळाने निश्चित केलेल्या अभ्यासक्रमावर प्रश्नपत्रिका तयार करण्यात यावी. सदर अभ्यासक्रमासाठी अभ्यासमंडळे विभागाने विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली परिपत्रके/पत्रे अवलोकनी घ्यावीत. तसेच प्रश्नपत्रिका महाविद्यालातील शिक्षकाकडून तयार करून घेण्यात याव्यात. सदर शिक्षकांना प्रश्नपत्रिका तयार करण्याबाबतचे पत्र संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक यांनी द्यावे.

5. उपरोक्त अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन परीक्षा आयोजित करण्यात येणार असल्यास त्याबाबतच्या अनुषंगिक तयारी करण्यात यावी. तसेच सदरबाबतची सूचना सर्व संबंधीतांना देणेत याव्यात.

6. उपरोक्त अभ्यासक्रमाच्या ऑफलाईन परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका तयार करतांना प्रत्येक प्रश्नाच्या खाली/समोर उत्तरासाठी जागा ठेवण्यात यावी.

   उदा. – प्रश्न ......................................................................................................... | योग्य पर्याय |

   A)-------------- B)-------------- C) -------------- D) -------------

7. उत्तरासाठी √ (टिकमार्क) न करता चौकटीमध्ये उत्तर लिहीण्यात यावे (उदा. A, B, C, D इत्यादी )

8. या परीक्षेकरीता स्वतंत्र उत्तरपत्रिका वापरण्यात येवू नये. तसेच विद्यापीठाकडून OMR शीट पाठविण्यात येणार नाहीत.

9. प्रश्नपत्रिका महाविद्यालयामध्ये तपासून प्राप्त गुण विद्यापीठाकडून उपलब्ध होण–या संगणक प्रणालीत कोणतेही रूपांतर न करता भरण्यात यावेत. तसेच विद्यापीठाकडे प्राप्त होणा–या विद्यार्थ्यांच्या गुणांचे रूपातर (Conversion) आवश्यकतेप्रमाणे विद्यापीठाकडून करण्यात येणार असल्याने जे गुण विद्यार्थ्यांना प्राप्त होतील तेच गुण संगणक प्रणालीमध्ये भरणेचे आहेत. विद्यार्थ्यांच्या गुणाबाबत कोणतीही तकार विद्यापीठाकडे येणार नाही याची दक्षता घ्यावी..

10. महाविद्यालय/अधिविभागामध्ये परीक्षा कर्तव्य पार पाडताना परीक्षेची गोपनीयता, पावित्र्यता जपणे आवश्यक आहे यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना अंमलात आणाव्यात व दक्षता घ्यावी.

11. वरील मार्गदर्शक तत्वे व सूचनांचे अवलोकन करून याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरून सूचित करावे व विद्यापीठास सहकार्य करावे.

(श्री. अजितसिंह जाधव)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत:

1. सर्व उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– परीक्षा विभाग
2. आयटी कक्ष – संबंधीत अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता संगणक प्रणालीतून योग्य ती सुविधा उपलब्ध करून दयावी.
3. परीक्षा विभागातील सर्व संबधित विभाग व अधिकारी – पुढील कार्यवाहीसाठी

D/March 2022 Exam/Letter1